# THE BOMBAY SPECIAL SUITS AND PROCEEDINGS VALIDATING ACT, 1951

(Bombay XV of 1951)

## मुंबई विशेष दावे व कामे वैधकरण अधिनियम, १९५१

### अनुक्रमणिका

प्रस्तावना.

कलमें.

| | | पान |
|---|---|---|
| १ | लघुसंज्ञा व सुरुवात ... ... ... ... ... ... | ७११ |
| २. | व्याख्या ... ... ... ... ... ... ... | ७११ |
| ३. | हुकूमनामे व आदेश वैध समजणें ... ... ... ... ... | ७१२ |
| ४. | अनिर्णित असलेले व फेटाळून लावलेले दावे व कामें ... ... ... | ७१२ |
| ५. | उच्च न्यायालयांत भरलेल्या फीची सूट ... ... ... ... | ७१३ |
| ६. | शहर न्यायालयांत दाखल केलेल्या दाव्यांच्या व कामांच्या बाबतीत मुदत वगळणें ... | ७१३ |
| ७. | अनिर्णित दाव्यांची व कामांची सुनावणी ज्या टप्प्यापासून करावयाची तो टप्पा ... | ७१३ |
| ८. | अडचणी दूर करणें ... ... ... ... ... ... | ७१३ |

# सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १५*

[मुंबई विशेष दावे व कामें वैधकरण अधिनियम १९५१]

[२४ एप्रिल १९५१]

## मुंबई राज्यांतील विशेष क्षेत्राधिकाराखालील दावे व कामें वैध ठरविण्याबाबत अधिनियम

ज्याअर्थी पंचवीस हजार रुपयांपेक्षां अधिक नाहीं इतक्या किंमतीचे व बृहन्मुंबईत उद्भवलेले असे दिवाणी स्वरूपाचे दावे व कामें स्वीकारणें, त्यांचा इन्साफ करणें व तीं निकालांत काढणें यासंबंधीं क्षेत्राधिकार तारीख २० माहे जानेवारी सन १९५० रोजीची गृह विभागाची सरकारी अधिसूचना क्रमांक २३४६/५ अनुसार राज्य सरकारनें मुंबई शहर दिवाणी न्यायालयास दिलेला आहे ;

ज्याअर्थी मुंबई उच्च न्यायालयानें प्रारंभिक दिवाणी क्षेत्राधिकाराखालील सन १९५० चा दावा क्रमांक २४० यांत उक्त अधिसूचना अवैध व परिणाम शून्य आहे असा निर्णय दिला ;

ज्याअर्थी भारताच्या सर्वोच्च न्यायालयानें आपला दिवाणी अपील क्षेत्राधिकार चालवून, सन१९५० चे दिवाणी अपील क्रमांक १० यांत मुंबई उच्च न्यायालयाचा उक्त निर्णय रद्द ठरविला आणि उक्त अधिसूचना अधिकारांतर्गत व वैध आहे असा निर्णय दिला ;

ज्याअर्थी उक्त अधिसूचनेची तारीख आणि सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय यामधील मुदतींत दिवाणी स्वरूपाचे कांहीं दावे व कामें मुंबई उच्च न्यायालयांत दाखल करण्यांत आले आहेत आणि त्यांपैकीं कांहींचा इन्साफ करण्यांत येऊन ते निकालांत काढण्यांत आले आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त दावे व कामें यांत दिलेले हुकमनामे व आदेश वैध ठरविणें आणि फेटाळून लावलेले किंवा अनिर्णित असलेले दावे व कामें शहर न्यायालयाकडे परत पाठविण्याची व त्यास सादर करण्याची तरतूद करणें आवश्यक व इष्ट आहे ;

त्याअर्थी याअन्वयें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :—

१. (१) ह्या अधिनियमास मुंबई विशेष दावे व कामें वैधकरण अधिनियम, १९५१, असें म्हणावें. लघुसंज्ञा व सुरुवात.

(२) तो, राज्य सरकार राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे याबाबत जी तारीख नेमील त्या तारखेस अंमलात येईल.

२. विषयांत किंवा संदर्भात एतद्विरुद्ध कांहीं नसल्यास, ह्या अधिनियमांत,— व्याख्या.

(१) "विशेष क्षेत्राधिकाराखालील दावे व कामें" या शब्दांचा अर्थ, दहा हजार रुपयांहून अधिक परंतु पंचवीस हजार रुपयांहून अधिक नाहीं इतक्या किंमतीचा व बृहन्मुंबईत उद्भवलेला दावा किंवा काम असा समजावा; परंतु तींत मुख्य अधिनियमाचें कलम ३, कंडिका (अ) ते (ड) यांत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि दाव्याचा किंवा कामाचा समावेश होत नाहीं.

(२) "मुख्य अधिनियम" म्हणजे शहर दिवाणी न्यायालय अधिनियम, १९४८.

(३) "क्षेत्राधिकारासंबंधीं अधिसूचना" म्हणजे, मुख्य अधिनियमाचें कलम ४ या अन्वयें मिळालेले अधिकार चालवून राज्य सरकारनें काढलेली व तारीख २० माहे जानेवारी सन १९५० रोजीं राजपत्रांत प्रसिद्ध केलेली तारीख २० माहे जानेवारी सन १९५० रोजींची (गृह विभागाची) सरकारी अधिसूचना क्रमांक २३४६/५.

---

*दिनांक १५ नोव्हेंबर १९५९ पर्यंत सुधारलेला.

(४) "सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय" या संज्ञेचा अर्थ, सर्वोच्च न्यायालयानें आपला दिवाणी अपील क्षेत्राधिकार चालवून सन १९५० चा दिवाणी दावा क्रमांक १०—मुंबई राज्य विरुद्ध नरोत्तमदास जेठाभाई व ए. पी. फिलिप्स—यांत दिलेला निर्णय असा समजावा.

(५) ह्या अधिनियमांत ज्यांची व्याख्या केलेली नाहीं परंतु ते वापरले आहेत अशा शब्दांचा व शब्दप्रयोगांचा अर्थ मुख्य अधिनियमांत त्यांस जो अर्थ दिलेला असेल तोच असेल.

हुकूमनामे व आदेश वैध समजणें.

३. (१) क्षेत्राधिकारासंबंधीं अधिसूचनेच्या तारखेस किंवा त्यानंतर उच्च न्यायालयांत दाखल केलेल्या विशेष क्षेत्राधिकाराखालील दाव्यांत किंवा कामांत आपला प्रारंभिक किंवा अपील क्षेत्राधिकार चालवून उच्च न्यायालयानें दिलेले हुकूमनामे किंवा आदेश हे, मुख्य अधिनियमांत काहींहि असलें तरी उच्च न्यायालयानें वैधरीत्या दिलेले आहेत असें समजलें पाहिजे आणि उक्त हुकूमनामे किंवा आदेश ज्या दाव्यांत किंवा कामांत दिले ते दावे किंवा तीं कामें मुख्य अधिनियमाचीं कलमें ४ व १२ यांचें उल्लंघन करून स्वीकारण्यांत आलीं होतीं, त्यांचा इन्साफ करण्यांत आला होता किंवा तीं निकालांत काढण्यांत आलीं होतीं केवळ याच कारणावरून उक्त हुकूमनामे व आदेश अवैध आहेत असें समजतां कामा नये.

(२) मुख्य अधिनियमांत काहींहि असलें तरी, ज्या दाव्यांत किंवा कामांत असे हुकूमनामे किंवा आदेश देण्यांत आले ते दावे किंवा तीं कामें उच्च न्यायालयाकडून वैधरीत्या स्वीकारण्यांत आलीं होतीं असें समजून उच्च न्यायालयानें अशा हुकूमनाम्यांतून किंवा आदेशांतून उद्भवणारीं सर्व अपिलें व बजावणी-विषयक कामें स्वीकारलीं पाहिजेत, त्यांचा इन्साफ केला पाहिजे किंवा तीं निकालांत काढलीं पाहिजेत.

अनिर्णित असलेले व फेटाळून लावलेले दावें व कामें.

४. (१) क्षेत्राधिकारासंबंधीं अधिसूचनेच्या तारखेस किंवा त्यानंतर उच्च न्यायालयांत दाखल केलेल्या व ह्या अधिनियमाच्या सुरुवातीस उक्त न्यायालयांत अनिर्णित असलेल्या सर्व विशेष क्षेत्राधिकाराखालील दाव्यांतील किंवा कामांतील पक्षकारानें ह्या अधिनियमाच्या सुरुवातीच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आंत अर्ज केला असतां, उक्त न्यायालयानें असे दावे किंवा कामें हीं, त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि विधींत काहींहि असलें तरी, शहर दिवाणी न्यायालयाकडे परत पाठविली पाहिजेत. अशा कोणत्याहि दाव्याच्या किंवा कामाच्या संबंधांत उक्त तीन महिन्यांच्या आंत असा कोणताहि अर्ज करण्यांत आला नाहीं तर, असा दावा किंवा काम फेटाळण्यांत आलेलें आहे असें समजलें जाईल.

(२) सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर परंतु ह्या अधिनियमाच्या सुरुवातीपूर्वी विशेष क्षेत्राधिकाराखालील जे दावे किंवा जीं कामें मुख्य अधिनियमाचीं कलमें ४ व १२ याअन्वयें तीं स्वीकारण्यास, त्यांचा इन्साफ करण्यास व तीं निकालांत काढण्यास उच्च न्यायालय सक्षम नव्हतें या कारणावरून उच्च न्यायालयानें फेटाळून लावलीं असतील ते सर्व दावे व तीं सर्व कामें, उच्च न्यायालयानें तीं फेटाळून लावलेलीं असलीं तरी, पुढें सांगितलेल्या मुदतींत शहर न्यायालयांत दाखल करतां येतील. म्हणजे तीं ह्या अधिनियमाच्या सुरुवातीच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या मुदतींत किंवा भारतीय मुदत अधिनियम, १९०८ च्या उपबंधान्वयें अशा दाव्यांच्या किंवा कामांच्या बाबतींत लागू असलेल्या मुदतींत, यांपैकीं जी मुदत अधिक असेल त्या मुदतींत दाखल करतां येतील.

(३) विशेष क्षेत्राधिकाराखालील जे दावे व जीं कामें पोट-कलम (१) मध्यें निर्दिष्ट केलेल्या मुदतींत शहर न्यायालयांत तीं दाखल करण्यासाठीं परत पाठविण्यांत यावी म्हणून अर्ज करण्यांत आला नव्हता या कारणावरून उक्त पोट-कलम (१) अन्वयें फेटाळून लावण्यांत आलेली असल्याचें समजलें गेलें असेल ते सर्व दावे व तीं सर्व कामें भारतीय मुदत अधिनियम, १९०८, अन्वयें अशा दाव्याच्या किंवा कामाच्य बाबतींत लागू असलेल्या मुदतींत शहर न्यायालयांत दाखल करतां येतील.

(४) जे दावे किंवा जीं कामें पोट-कलम (१) अन्वयें शहर न्यायालयांत दाखल करण्यासाठीं परत पाठविण्यांत आलीं असतील त्या दाव्यांच्या किंवा कामांच्या बाबतींत मुख्य अधिनियमाचें कलम १३ यांतील कोणताहि उपबंध लागू होणार नाहीं

५. कलम ४ मध्यें उल्लेख केलेला कोणताहि दावा किंवा काम शहर न्यायालयांत दाखल करण्यांत येईल तेंव्हा, अशा दाव्याच्या किंवा कामाच्या बाबतींत ते दाखल करण्यासाठीं वसूल करण्याजोग्या फीचा हिशोब करतांना उच्च न्यायालयानें वसूल केलेली कोणतीहि न्यायालय फी जमेस धरली पाहिजे आणि यथास्थिति तें शहर न्यायालयात दाखल करण्यासाठीं परत पाठविण्यांत येईल त्या तारखेपर्यंत किंवा तें फेटाळण्यांत येईल त्या तारखेपर्यंत झालेल्या खर्चाची आकारणी ही मुख्य अधिनियमाचें कलम १८, पोट-कलम (२) अन्वयें केलेल्या नियमांनीं विहित केलेल्या रीतीनें, जणूं तें उक्त कलमाअन्वयें शहर न्यायालयाकडे पाठविण्यांत आलें होते असें समजून, केली पाहिजे. उच्च न्यायालयांत भरलेल्या फीची सूट.

६. कलम ४, पोट-कलम (१) मध्यें उल्लेख केलेल्या व शहर न्यायालयांत दाखल केलेल्या कोणत्याहि दाव्याच्या किंवा कामाच्या बाबतींत मुदत मोजतांना, उक्त दावा किंवा काम उच्च न्यायालयाकडून ज्या तारखेस स्वीकारण्यांत आले त्या तारखेपासून उक्त दावा किंवा काम शहर न्यायालयांत दाखल करण्यासाठीं उच्च न्यायालयाकडून ज्या तारखेस परत पाठविण्यांत आलें त्या तारखेपर्यंतची मुदत वगळण्यांत आली पाहिजे. शहर न्यायालयांत दाखल केलेल्या दाव्यांच्या व कामांच्या बाबतींत मुदत वगळणें.

७. कलम ४, पोट-कलम (१) अन्वयें शहर न्यायालयांत दाखल करण्यासाठीं परत पाठविण्यांत आलेले दावे किंवा कामें शहर न्यायालयांत दाखल करण्यांत येतील तेव्हां, त्यांची सुनावणी उच्च न्यायालयाकडून ज्या टप्प्यापर्यंत करण्यांत आली असेल त्या टप्प्यापासून त्याचा इन्साफ करून तें निकालांत काढण्यांत आलें पाहिजे आणि उच्च न्यायालयांत अशा दाव्याचा किंवा कामाचा अशा ज्या टप्प्यापर्यंत इन्साफ झाला असेल त्या टप्प्यापर्यंत असलेले त्याचे कागदपत्र हे, जणूं ते शहर न्यायालयांत मूलतः स्वीकारण्यांत आलें होतें असें समजून शहर न्यायालयांतील त्याचे कागदपत्र म्हणून राहतील व त्यांचा भाग म्हणून बनतील. अनिर्णित दाव्यांची किंवा कामांची सुनावणी ज्या टप्प्यापासून करावयाची तो टप्पा.

८. वरील उपबंधांत उल्लेख केलेल्या कोणत्याहि दाव्याचा किंवा कामाचा इन्साफ करण्याच्या बाबतींत किंवा तें निकालांत काढण्याच्या बाबतींत कोणतीहि अडचण उपस्थित झाल्यास, हुकूमनामे किंवा आदेश यांच्या बजावणीच्या बाबतींत किंवा त्यापासून उद्भवलेल्या अपिलांची सुनावणी करण्याच्याबाबतींत किंवा तीं निकालांत काढण्याच्या बाबतींत कोणतीहि अडचण उपस्थित झाल्यास, उच्च न्यायालयास, अशी अडचण दूर करण्यासाठीं आवश्यक किंवा इष्ट वाटेल असे आदेश देण्याचा अधिकार आहे. अडचणी दूर करणें.